Vol 3 Issue 3 April 2013

Impact Factor : 0.2105

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 3, Issue. 3, April. 2013
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# *अस जगणं तोलाच :– एक जीवनदर्शन*

*खरात लालबा विश्वनाथराव*

एम.ए.एम.फिल. मराठी नेट

***सारांश:***

भारत हा शेती प्रधान देश म्हणून आज सुध्दा ओळखला जातो. म्हणजे या देशातील बहुतांशू लोक शेती जीवनावर अवलंबून आहेत. शेती व्यवसाय जसा मानवी सामर्थ्यावर अवलंबून आहेच पण त्यापेक्षा तो निसर्गावर अधिक अवलंबून आहे. म. ज्योतीबा फुले, कृष्णराव भालेकर, रा.वि. टिकेकर, वि.रा. शिंदे इ. विचारवंताच्या साहित्यातून शेतक–याच्या दारिद्री, कष्टमयी, आणि दुःखदायक जीवन विषयक अत्यंत पोटतिडकीने लिहिले आहे. शेतक–याच्या अशा प्रकारच्या वरील जीवनाविषय जगण्यामागची कारणे लक्षात घेतली असता तर असे लक्षात येते की, त्यांचे अज्ञान, त्यांचा धर्मभोळेपणा, त्यांचे कर्जबाजारीपणा आणि त्यांचे विस्थापित असणे हेच प्रामुख्याने शेतक–यांचे मुळ कारण आपणास दिसून येते. स्वातंत्र प्राप्ती नंतर शेतक–यांचे जीवनमानात फरक पडावा ते सुधारावे, उंचावावे यासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न सुरु असतात. आज आधुनिकीकरण जवळपास सर्वच क्षेत्रात विकसित पावत आहे. यामुळे शेतक–यांना ब–याच प्रमाणात पफायदा झाल्याचे दिसून येते. शिक्षण, पाणीपुरवठा किंवा जलसिंचनाच्या योजना, शासकिय पातळीवर होणा–या किटकनाशके, रसायनिक खतांचा पुरवठा करणारे कारखाने, यांचा कांही प्रमाणात का होईना शेतक–याचा नक्कीच फायदा झाल्याचे दिसून येते. पण ते छोटे छोटे शेतकरी किंवा अल्पभूधारक कोरडवाहू जमीनधारक, यांच्या पदरात ती किती पडतो ६ असे जिवन जर बघितले तर फारशी समाधानकारक परिस्थिती आढळून येत नाही. असे आपल्या लक्षात येईल. आजची परिस्थिती लक्षात घेतली तर हा व्यवसाय अजूनही बेभरोशाचा राहीला आहे. आजची परिस्थिती पाहिली तर आज निसर्गाची अवकृपा, दुष्काळी परिस्थती, शेती मालाच्या किंमती ठरवण्याच्या बाबतीत शासनाने निष्क्रीय धोरण राज्याची आणि पुढारी यांचे राजकारण, व्यापारांचे संघटन यामुळे आजही शेतक–यांच्या मोठया प्रमाणात शोषन होताना दिसून येते असेच म्हणावे लागते.

प्रस्तावना :

ग्रामीण साहित्यात शेतक–यांच्या शोषणाकडे त्यांच्या आडचणीकडे फारसे लिहिले गेलेले नाही. याचा अर्थ असा नाही की, मराठी ग्रामीण साहित्यातून असा विषय आलाच नाही पण शेतक–याच्या जीवनातील सुक्ष्म ताण–तणाव आणि त्यासाठी कारणीभूत असणा–या घरा विषयी वास्तवाच्या पातळीवरुन व खोलात जावून लिहिलेले नाही. ग्रामीण कादंबरी या वाडण्मय प्रकाराचा विचार केला गेला तर रा. वि. टिकेकर उर्फ धनुर्धारी यांची 'पिराजी पाटील' ना.वि. कुलकर्णी यांची 'पैसा', र. वा. दिघे यांची 'पाणकळा' आणि ' आई आहे शेतात ' या दोन कादंब–या रा. रं. बोराडे यांची 'चारापाणी' ही कादंबरी, आनंद यादव यांची 'गोतावळा' तसेच बाबाराव मुसळे यांची 'हाल्या हाल्या दुधू दे' इ. कादंब–यांचा निश्चित उल्लेख आपणांस करता येईल.वरील विवेचना वरुन शेतक–याच्या शोषणाकडे पाहत असतांना एका ग्रामीण कादंबरीचा उल्लेख आवर्जुन करावेसे वाटते ती म्हणजे शेषराव मोहिते यांची 'अस जगणं तोलाचं' ही कादंबरी याच मालिकेतील एक लक्षणीय कादंबरी आहे. शेषराव मोहिते हे ग्रामीण साहित्य चळवळीशी जोडलेले नाव आहे. त्याच प्रमाणे शेतकरी चळवळीशीही जोडलेले नाव आहे. 'असं जणं तोलाचं' याची ही पहिली कादंबरी असून सुध्दा मराठी वाचकांचे लक्ष वेधून घेण्याचे सामर्थ्य तिच्यात नक्कीच आहे असे मला वाटते. व्हताळ या कर्नाटकाच्या सीमेजवळील एक लहानशा खेडयात राहणा–या हारीबा आणि कासाबाई या शेतकरी दाम्पत्याच्या कुटुंबाची ही कथा आहे. हाणमू आणि नामू यांच्या लग्नासाठी गावातील विष्णू कारभारी सावकाराकडून काढलेल्या कर्जातून या कादंबरीच्या शोकात्म कथेला सुरुवात होते. शेतकरी कितीही पैसा खर्च केला आणि उरफाटेपर्यंत कष्ट केले तरी शेतीचा व्यवहार हा बेभरोशाचा व आतबटयाचा ठरुन नामूचे दारिद्रय फिटत नाही. मोठया कष्टाने विहिर खोदून पाणी लागल्यावर एक एकर उस लावला. पीक चांगल आले. आडीचशे एकर डाग गुळ झाला. पण बाजारात एकुणच माल जास्त आल्यानं किंमत कमी आल्याने देणी फिटून हाती काहीच उरले नाही. उललट शिक्षक असलेल्या भावाने उसणे पासणे करुन आणलेले पैसे परत करायला जमले सुध्दा नाही. अशी ही दैना यांच्या कुटूंबाची चालूच राहते.

या कादंबरीचा आजून एक पैलू असा आहे की, लेखक या कादंबरीच्या माध्यमातून संपूर्ण शेतक–यांना सांगण्याचा प्रयत्न करतात की, शेतक–यांची मुलांनी शिक्षण घेतलं पाहिजे. याच कादंबरी मधून 'गोपाळ' या व्यक्तिचित्रणाच्या तोडून असे वदवले आहे की, गोपाळ नामुला पत्र लिहितो '' आपूण सा–यांनी मिळून केल्याली धडपड आशी वाया गेली. त्येला ना तुजा ईलाज ना माजा ईलाज पण हेच्या पुडं एक गोष्ट ध्यानात ठेव. बापाचे दिवस पोराला येउ नयेत आसं वाटत असल तर शिरुला हया गाळात रुतू देवू नको पोरग तुझा काय, माझा काय ! डोक्यान मोप चांगल हाय पण शेताच्या नादानं वाया चाललय, त्येला बाहेर काडायच बगु''[1] तसेच पाहता गोपाळ च्या शिक्षणाची कासाबाई धडपड करतांना दिसून येते गावात दुसरी पर्यंत शाळा होती पुढे कासाबाई गोपाळ तिसरीला बलसुरला सरकारी शाळेत पाठवते. तेव्हा कासाबाईच्या तोंडूण हे उद्गार निघातात ''बर झाल माल, लेकराच्या मनासारक झाल साळतून काढल्यापासून लेकरु आर्ध्याला आर्द राहयल न्हवत. त्येच हाल बगवना झालते आता पुडच्या पुडी बगायला यील पणतस आंगचीच गोडी हाय त्येला शिकण्याची कोण कायी सांगा–सवरायची त्याची बी गरज न्हाई त्येला. आता वडाताण तर काय आपल्या जन्माला लागल्याची हाय की,त्याला बसविलं मंजी का ती टाळणा–याचा कुलाबीकच करायला तर नामू हायच की, दोगा माणसाचे काम एकटाच कराय सारका ''[2]

गोपाळच पत्र आणि गोपाळला शिक्षणाची कासाबाईची धडपड यातून जसे शिक्षणाचे महत्व सांगितले आहे त्याच प्रमाण शेती व्यवसाया विषयी तिरस्कारही व्यक्त झालेला आहे. हा तिरस्कार गोपाळ आणि त्यांच्या कुटूंबाला भोगाव्या लागलेल्या यातनामधून आलेला आहे. पण शेतक–याच्या मुलाने निरक्षर राहून नुसतीत काबाड कष्ट करुन आयुष्य वाया घालविण्यात अर्थ नाही. हेच त्याला सुचित करायचे आहे. शेती फायदेशीर करायची असेलतर त्याला शिक्षणाची जोड असण्याची गरज आहे हेच लेखकाला या कादंबरीच्या माध्यमातून सांगावेसे वाटते.

**Title :** *अस जगणं तोलाच :– एक जीवनदर्शन*
**Source:Indian Streams Research Journal [2230-7850 ]** *खरात लालबा विश्वनाथराव* **yr:2013 vol:3 iss:3**

या कादंबरीतील महत्वाचा पैलू म्हणजे स्त्री जीवन होय. प्रत्येक शेतक–यांच्या घरातील स्त्रीचे जीवन महत्वाचे असते. जसे की या कादंबरीतील कासाबाई, धुरपा, हिरकणी, कस्तुरी आणि शांती या स्त्रिया पाहितल्यावर असे लक्षात येते की, दारिद्रय भोगणा–या शेतक–यांच्या घरातील स्त्रीयांच्या वाटयाला सर्वात अधिक दुःख येते उपजत अशा प्रकारची सोशिकता समाज आणि कष्टाळूपण हा स्त्रीयांचा स्वभाव धर्म आहे. ज्या ज्या वेळी प्रसंगामुळे, संकटामूळे, संकटामुळे, घरातील पुरुष खचून जातो, हातपाय गाळूण बसतो किंवा पळ काडतो तेव्हा या स्त्रिया धैर्याने पुढे येतात. हे प्रत्येक समाजातील वास्तव आहे असे मला वाटते. परिस्थितीशी प्रत्येक येणा–या संकटाशी किंवा आलेल्या संकटाशी सामना करायला स्वबळावर तयार राहतात. उदाहरण दयावयाच झाल्यास या कादंबरीतील कासाबाई कडे बघितलतर असे लक्षात येते की, विष्णु कारभारी या सावकाराचे कर्ज वेळेवर परत करु शकत नाही म्हणून हरीबा देवळात जावून बसतो किंवा न सांगता पंढरपुरला दिंडी बरोबर निघून जातो. विष्णू कारभारी कर्जाच्या वसूलीसाठी चावडीवर बोलवून गावक–यां समोर हरिबाच्या कुटूंबाचे अपमान करतो. ते लहान हणमूला सहन न होता हणमू अफू खावून आत्महत्या करतो. गावात पोलिस येताना गावात सावकार बोंबाबोम ठोकतो, पोलिसांचे मागे लावण्यासाठी कासाबाई ने त्याला विष घालून मारले म्हणून सावकार गावात अफवा पसरवितो तेव्हा ही हरिबा न सांगता तांबरवाडीच्या भाच्चीकडे निघून जातो. कासाबाईवर दुःखाचा डोंगर कोसळतो तेव्हा कासाबाई मूलानां घेवून माहेरी भावाकडे निघून जाते तेंव्हा तिथ आपल्या म्हाता–या आईच्या गळयात पडून ती रडत म्हणते की '' माय तुला काय सांगू ये माजा वनवास ! भाडयान आपला घात करुन घेटला. पण माज्या लेकराबाळाला दिवस आटला. गावात मला तोंड दाकवायला जागा ठिवलानी. तेला घालूनच मारायचं –हायल आसत माज्या मनात, तर तवाच मारुन घाटले आसते. पण हितके दिवस संबाळ करुन बी शेवटाला माज्यावर आळ घालून गेला. गेला तर गेला आळ आला तरीबी मी सोसले आसते ये सार. पण त्या नव–या भाडयाच्याबी मनात काय शिरलय कळना झालय. ल्योक गेला तवापासून त्येन बी माज्या संग पोटात गाठ ठिवूनच वागतोय. आता तर कुणाला ना सांगता सावरात घरदार सोडूनच निघून गेलाय सन्याशी माटाचा''[3] आशा प्रकारे आपल्या संसाराची विसकटलेली घडी, आणि या सर्व संकटाना ती धैर्याने, खचून न जाता नामूचा संसार, दोन मूलीच लग्न गोपाळाचे शिक्षण या सर्वानसाठी ती राब राब राबते.

अशीच धुरपा रंगाने काळी कासाबाईच्या भावाची मुलगी नामुची ती बायको सुरुवातीला नामु धरुपाशी संसार करायला नकार देतो पण ती सर्व सहन करुन होणारा कोंडमारा सोसत असते. सतत कष्ट उपसते गोपाळच्या शिक्षणासाठी ती कासाबाईला म्हणजे सासूला मदत करते गोपाळला पुढे शिक्षण शिकायचे आसते त्यावेळेस तीचे उद्‌गार मार्मीक आहेत ''त्येचं बोलण तुम्ही उगु मनाला लावू नका माय आक्का ! आता रावसाब हेवडं हौसन लिव्हण शिकाव मंत्यात तर शिकवाव की बर ! लोकाच्या लेकराला मारु मारु न्हिउन शाळात कोंडवून घाटल तरीबी पळू पळू येत्यात आणि तुमी मातोर उगूचच त्येला ईच्यार न हेला ईच्यार करीत पंच्यात्या घालत बसलाव. एका संग उगूचच सगळयाची परवडच करीत –हाव काकाय मनाव मानसाना मामाजीबी कायी बोलत नीत ना काय न्हाई, तुमही उगू माज ऐका आक्का जायचच हाय मत्यात रावसाब लिव्हण शिकायला तर त्येला जाउ दया''[4] आशा प्रकारे धुरपा सासू, सासरे, नणंदा, दीर यांना जपताना दिसून येत. शांता नावाची स्त्री व्यक्ति रेखा पाहवयास मिळते. शांता विष्णू सावकाराची नात नामू गोपाळ यांच्या दोघात भाडंण लागावे म्हणून सावकाराने डाव खेळला शांता हिच लग्न गोपाळशी लावलं. पण त्याचा पुर्वीचा राग गोपाळ विसरत नाही तिला नोकरीच्या गावी नेत नाही. तरीपण शांता सासरी गरीबीत समाधान राहते. नुसती राहत नाही तर घरातील सर्वच काम कष्टाने सगळया बरोबर उपसत असते. अशा प्रकारे कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा आतोनात कष्ट उपसताना दिसून येतात विशेष करुन कासाबाई आणि धुरपा.

या कादंबरीच्या आणखी एक पैलू म्हणजे कादंबरीतील इतरव्यक्तिरेखा जसे की, विष्णू कारभारी, नारायण बेरड, देवराव, कोंडीबा माणिकराव पोलिस पाटील, आणि हरिबांचा मित्र केशव पाटील कुठेन कुठे ही व्यक्तिरेखा या कादंबरीत चोख काम पार पाडत असत जसे की विष्णू कारभारी हरिबाच्या कुटूंबाला त्रास देणे, केशव पाटील हरिबा वर येणा–या संकटावर धावू येणे, या कादंबरीत भाग येताना दिसून येतो.

ग्रामीण भागात मुख्य गोष्ट म्हणजे खाजगी स्वरुपाची सावकारी, आणि या सावकारीच्या आधारावर गरिब शेतक–याची होणारी पिळवणूक फसवणूक आणि त्यांच्या संसाराची होणारी परवड यांचे चित्रण आज सुध्दा तागायत आहेत. तसेच आपआपसातील द्वेष मत्सर, राग, लोभ, आणि त्यासाठी चालणारी कुटील कारस्थाने यांचे ही दर्शन या कादंबरीच्या माध्यमातून घडवताना दिसून येतात. या कादंबरीचे आणखी एक पैलू म्हणजे कादंबरीत भाषा होय. या भाषेमुळे कादंबरीतील पुर्ण परिसर दृगोचर होतो. महाराष्ट–कर्नाटक सीमेवर बोलली जाणारी भाषा संवाद आपले खास लक्ष वेधून घेते. उदाहरण पाहत असतांना या कादबरीतील संवादातून येते उदा. '' सासात म्हयने कस का व्हयना हया मळयात व्हतो मनून जीव रमला. गुराळातले पंदारादी तीन वार तर कवा निगून गेले कळाल बी न्हाई. माणसं बी किती गुणाचे ! न्हाई तर आसल्या वक्ताला कोण कुणाला वळक दिवलालय ? तीबी आजकालच्या जमान्यात! पण आपल ॱ बी आबात आब हायं तवरच हित्तून निगून जाण चांगल आपल्या आपल्या रानातबी जाउन काय केल तर व्हायचं न्हाई का आपल्याच्यान ! आपल्या बी मळयाचं रान कायी पावण्याच्या रानाच्या म्हाग न्हवं पण काय कराव आपली बी सवती हिर –हायची असती, मनासारक पाणी –हायल आसतं, तर आपून बी गुराळ केलोच असतो. गाडया भरु भरु घरच्या गुळाच्या खेपा लातूरला मारलो असतो. '' 5 या संवादावरुन कानडी भाषेचा अभाव पडलेला जाणवतो हेल काढून बोलण्याची लकबही जाणवते.

## *निष्कर्षः–*

या कादंबरीतील नाटयपूर्ण संवाद आणि निवेदनातील सहजता कादंबरीच्या वाचनीयत मध्ये भर टाकते. थोडकयात, शेषराव मोहिते यांनी ग्रामीण माणसे, त्यांची मानसिकता त्यांचे ग्रामीण समाज जीवन, त्याच बरोबर आचार–विचार, ताणतणाव, ग्रामीण जीवना मधील राजकारण आणि समाजकारण, रीतिरिवाज आणि अर्थकारण, अर्थ व्यवस्था, शेतक–यांच्या जिवनातील संघर्ष आणि समस्या यांची उत्तम जाण या कादंबरीच्या माध्यमातून आपल्या पर्यंत पोंहचविण्याचे काम केल्याचे दिसून येते. त्यामुळेच ते वास्तवस्पर्शी झाल्याचे दिसून येत असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

## *संदर्भ ग्रंथ :–*

1. अस जगणं तोलाच : शेषराव मोहिते, देशमुख ॲण्ड कंपनी प्रकाशन, पुणे आ.प्र. 1994. पृष्ठ क्र. 275
2. उपरोक्त कित्ता पृष्ठ क्र. 110
3. उपरोक्त कित्ता पृष्ठ क्र. 73
4. उपरोक्त कित्ता पृष्ठ क्र. 108ण
5. उपरोक्त कित्ता पृष्ठ क्र. 85

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net